# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
25 जानेवारी, 2016

## ‘नवीन रशियाचा उदय’ विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद

मध्य युरेशिया अभ्यास केंद्र, राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ,व शैलेंद्र कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स, दहिसरच्या संयुक्त विद्यापीठाने शुक्रवार, शनिवार दि.२९-३० जानेवारी, २०१६ रोजी ‘नवीन रशियाचा उदय’ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील फिरोजशहा मेहता भवन येथे भरणार आहे. या परिषदेचे उद्घाटन रशियाचे भारतातील महावाणिज्य दूत सर्गेई कोटल्यार, रशियन विज्ञान व सांस्कृतिक केंद्राचे संचालक व्लादिमिरदेमेनतेव्ह, माजी राजदूत अशोक सज्जनहार, रशियातील तज्ज्ञ प्रोफेसर सरगेई मार्केदिनोव्ह, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांच्या उपस्थितीत होणार आहे. उद्घाटन सोहळा सकाळी १०.०० वा. आयोजित करण्यात आला आहे. या दोन दिवसीय परिषदेत उद्योग, पर्यटन, भारत–रशिया संबंध, रशियाचे परराष्ट्र धोरण भारत-रशियातील तेलक्षेत्रातील संबंध, लष्करी सहकार्य, उर्जाधोरण, अर्थकारण, रशियाचे परराष्ट्र धोरण आदी विविध विषयांवर चर्चासत्रे या परिसंवादात आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमात भारत आणि रशियातील व भारतातील अनेक तज्ज्ञ, नामवंत, अभ्यासक विचार मांडणार आहेत. संपर्क : डॉ. स्वाती पितळे, दूरध्वनी क्र९८६९५७१४९२.

डॉ. संजय देशपांडे
संचालक